Vol 1 Issue 4 Jan 2012

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

Research Papers

# शिंदे–होळकराची लखेरीच्या युद्धांपर्यंतची वाटचाल : एक वास्तविकता

डॉ. डी. एस. कडव

सारांश :

पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील मराठयांच्या पराभवाचा परिणाम म्हणून मल्हारराव होळकर व महादजी शिंदे यांनी परस्परांशी सहकार्य करून मराठा राज्याची सेवा केली. पण मल्हारराव होळकराच्या मृत्युनंतर होळकर घराण्याचे प्रमूख म्हणून कार्य करणाऱ्या तुकोजी होळकर व महादजी शिंदे यांच्यात मतभेद सूरू झाले, पहिल्या इंग्रज–मराठा युद्धापर्यत हे मतभेद उग्र झाले नाहीत. मात्र 1782 नंतर तुकोजी होळकर व अहिल्याबाई होळकर यांनी महादजी शिंदेचा वाढता प्रभाव, प्रतिष्ठा कमी करण्याचे प्रयत्न चालविले. महादजी शिंदे यांचा विरोध करण्याचे धोरण अंगीकारले. महादजी संकटात असतांना त्याने मदतीची याचना करूनही अहिल्याबाई व तुकोजी यांनी मदत केली नाही. यामूळे महादजी व होळकर यांच्यात बेबनाव निर्माण झाला. नाना फडणवीसाने हा बेबनाव कमी करण्याऐवजी तुकोजीला महादजीचे विरोधात चिथावण्याचेच काम केले. परिणामतः तुकोजीने उघडपणे महादजीचा विरोध सूरू केला. अहिल्याबाई सहित होळकर घराण्यातील व्यक्तींनी महादजीवर सूड उगविण्याचे दृष्टीने कारवाया सूरू केल्या, तुकोजीने कवायती फौज तयार करण्यास प्रारंभ केला. महादजीला याची वार्ता कळताच त्यानेही लष्करी सज्जता सूरू केली. लहान सहान बाबींवरून त्यांच्यात लष्करी चकमकी सूरू झाल्या. अंतिमतः लखेरीच्या मैदानावर उघड लढाई झाली. त्यात होळकराचा पराभव झाला. या पराभवापासून होळकर घराण्याच्या सत्तेला उतरती कळा लागली. मराठा राज्यातील दुही उघड झाली. 1795 नंतर शिंदे–होळकर यांच्यात उघड दिर्घकालीन संघर्ष निर्माण झाला. हा संघर्ष मराठेशाही बरोबरच शिंदेशाही व होळकर शाहीचे पतन होण्यास कारणीभूत ठरला. हे प्रतिबिंबित करण्याच्या उद्देशाने सदर शोधनिबंध सादर करित आहे.

वृत्तांत :–

राणोजी शिंदे यांच्या मृत्यूनंतर शिंदे व होळकर या दोन सरदार घराण्यांमध्ये मतभेदांना प्रारंभ झाला. शह–प्रतिशहाचे राजकारण सूरू झाले. परस्पर विरोधी भूमिका घेतली गेली. याची परिणती पानिपतच्या तिसऱ्या युद्धापूर्वी मराठयांसमोर नानाविध संकटे निर्माण होण्यात झालीच पण त्यामुळेच या युद्धात मराठयांचा दारूण पराभवही झाला. पण यापासून कोणताही बोध दोन्ही सरदार घराण्यांनी घेतला नाही. काही काळ मल्हारराव होळकर व महादजी शिंदे यांनी परस्परांशी समन्व ठेवून कार्य केले. मात्र मल्हाररावांच्या मृत्यनंतर तुकोजी होळकर व महादजी शिंदे यांच्यात मतभेद सूरू झाले. पहिल्या इंग्रज–मराठा युद्धाच्या समाप्ती पर्यत त्या मतभेदांना प्रखर स्वरूप प्राप्त झाले नव्हते. मात्र त्यानंतर ते मतभेद उघड संघर्षात परिवर्तीत झाले.

तत्कालीन पूराव्यावरून महादजी शिंदे यांचे मराठा व राष्ट्रीय सत्ताकारणातील वाढते प्रभूत्व होळकर घराण्याच्या मनात हेवा व द्वेष निर्माण होण्यास कारणीभूत ठरले. याची प्रचिती लालसोटच्या मैदानावर महादजींचा पराभव झाल्यानंतर राजपूतांनी तसेच गुलाम कादर व ईस्माईल बेग यांनी केलेल्या व्यूहरचनेमूळे महादजी समोर उद्भवलेल्या संकटाचे वेळी आली.[1] या संकटाचे वेळी महादजीने अहिल्याबाई होळकर यांचेकडे मदतीसाठी अनेकदा विनंती केली. पण अहिल्याबाईने कोणत्याही प्रकारची मदत केली नाही.[2] अशी मदत न करण्याची कारणमिमांसा करतांना सरदेसाई लिहितात, ''ज्यावेळी शिंदे–होळकर दक्षिणेत होते, त्यावेळी अहिल्याबाई व महादजी यांचे संबंध चांगले होते. बाईला महादजीचा पाठींबा होता, पण महादजीच्या उत्तरेतील बडेजावपणामुळे बाईच्या मनांत त्याचेबद्दल हळूहळू हेवा उत्पन्न झाला.''[3] तर डॉ. कानुनगोही म्हणतात,''**....the dominating influence of Mahadaji Sindhia rankled even in the heast of the pious Ahalya Bai, she constantly egged on Tukoji Holkar to assert himself on terms of equality with**

Review Of Research
Vol.1,Issue.IV/Jan; 2012

**Mahadaji Sindhia….****[4] तसेच वा. वा. ठाकूर यांनी ही लिहिले आहे की, ''अहिल्याबाईच्या मनात उत्तरेतील प्रदेशाची वाटणी आपणास मिळावी अशी अपेक्षा होती. पण त्यासंबंधी महादजी शिंदे यांचेकडून कोणत्याही प्रकारचा खूलासा झाला नव्हता.''[5]

जरी अहिल्याबाईने महादजीला यावेळी मदत केली नसली तरी नाना फडणवीसाच्या आदेशाप्रमाणे तुकोजी होळकर फरवरी 1788 मध्ये महादजीच्या मदतीकरीता निघाला. 15 एप्रीलला तुकोजी महेश्वर येथे आला. महादजीने तुकोजीशी पत्रव्यवहार करून त्वरीत मदतीला येण्याची विनंती केली.[6] पण महादजीच्या विनंतीकडे तुकोजी होळकराने लक्ष दिले नाही. मदतीला जाण्याऐवजी तुकोजी महेश्वर येथे 6 महिने थांबला.[7] तुकोजीच्या मनात महादजीला मदत करण्याचे नव्हते असे अलीबहाद्दरने काढलेल्या उद्‌गारावरून स्पष्ट होते. सरदेसाई यांनी अलीबहाद्दर याचे म्हणणे नमूद केले आहे.[8] महादजीच्या मदतीसाठीच्या विनंतीकडे दुर्लक्ष करून तूकोजी उदयपूराकडे गेला. सरदेसाई यांच्या मते तसे करण्यास अहिल्याबाईने तुकोजीला सुचविले होते.[9] तुकोजीच्या या वर्तणुकीमूळे महादजीच्या मनात तुकोजी व अहिल्याबाई बद्दल संतापाची भावना निर्माण झाल्याचे महादजीच्या पत्रावरून तसेच 20 ऑगष्ट 1789 च्या सरकारी दप्तरातील नोंदीवरून दिसून येते.[10]

वर्षभर राजपूतान्यात राहिल्यानंतर तुकोजी 21 महिन्यानंतर मथूरेला महादजीच्या भेटीला गेला. महादजीच्या भेटीचे वेळी तुकोजीने जिंकलेल्या प्रदेशाचा व लूटीचा अर्धा हिस्सा मागीतला.[11] महादजीने अर्धा हिस्सा देण्याचे मान्य केले पण त्यासाठी तोपर्यंत आलेल्या खर्चाचीही वाटणी करण्याची अट ठेवली. पण तुकोजीने ती अट मान्य केली नाही. वाटणी संबंधीचा हा वाद बरेच दिवस चालला. त्यामूळे महादजी बराच नाराज झाला होता. तरीही महादजीने 9 लक्ष 21 हजार रूपये उत्पन्नाचा प्रदेश तुकोजीला देण्याचे त्याने मान्य केले. तसेच 2 लक्ष 10 हजारांच्या महालांच्या सनदा त्याने करून दिल्या. पण यामुळे तुकोजीचे समाधान झाले नाही. त्याने या सनदा महादजीकडे परत पाठविल्या. महादजीने त्या परत आलेल्या सनदा ठेवून घेतल्या.[12]

1789 मध्ये महादजी व अलीबहादूर यांच्यात गोसावी प्रकरणावरून मतभेद निर्माण झाले. त्यावेळी तुकोजीने अलीबहाद्दर याची बाजू घेतली. मात्र महादजी व अलीबहाद्दर यांच्यात समेट करतांना आपल्याला विश्वासात घेतले नाही म्हणून तुकोजी नाराज झाला होता.[13]

महादजीने तुकोजी व अलीबहाद्दर यांच्या विरोधात पूणे दरबाराकडे तक्रार केली होती. पण नाना फडणवीसाने त्याकडे मुद्दामच दुर्लक्ष केले. या संबंधाने सरकारांनी तर ''महादजीचे कार्य उध्वस्त करण्याकरीता तुकोजी व अलीबहाद्दर यांना नाना फडणवीसाने उत्तेजन दिले'' असा आरोप केला आहे.[14]

तरीही राजपुतांच्या कारवायांना उधाण आल्यामुळे महादजीने तुकोजीशी नमते घेण्याचे धोरण ठेवले. जिंकलेल्या प्रदेशाचा अर्धा हिस्सा दिला. पण त्यामुळे तुकोजीचे समाधान झाले नाही. त्याने अधिक हिश्याची मागणी केली. पण महादजीने ती पूर्ण करण्यास नकार दिल्यामूळे मेडत्याच्या युद्धानंतर तुकोजी महादजीला सोडून निघून गेला.[15] केवळ महादजीला सोडून तुकोजी गेला नाहीतर त्याने महादजीच्या विरोधात राजपूतांना पाठींबा देण्यास प्रारंभ केला. काशीराव व बापू होळकर हे महादजीच्या मदतीकरीता गेले होते. त्यांनाही तुकोजीने परत बोलावून घेतले होते.[16]

अशाप्रकारे तुकोजीने उघडपणे महादजीच्या विरोधात कार्य सूरू केले. त्यामुळे राजपूतांच्या विरोधी कारवाया वाढल्या. मराठा प्रदेशावरील त्यांच्या आक्रमणात वाढ झाली. अलवरच्या राज्यात गृह युद्ध झाले. महादजीला प्राप्त होणारा पैसाही बंद झाला. त्यामूळे लष्कराचे वेतन देणे महादजीला अशक्य झाले.[17]

1789 च्या शेवटी महादजीने मेवाडवर अधिकार करण्याकरीता तुकोजीचे लष्कर पाठविले होते. त्यावेळी त्या लष्कराने ईस्माईल बेगचे तहनिमकसर हे ठाणे हस्तगत केले. त्याबद्दल ईस्माईलने महादजीकडे तक्रार केली. महादजीने ते ठाणे सोडून देण्यास सांगीतले पण होळकराने ते सोडले नाही.[18] सरकारांनी म्हटल्याप्रमाणे ''होळकर शिंद्याच्या सत्तेला मान्य करित नव्हते.''[19]

ऑगष्ट 1790 मध्ये बादशहाने फरमान काढून पेशव्याला शाही संरक्षक व महादजीला त्याचा नायब नियुक्त केले. मथुरा व वृंदावन ही हिंदूची दोन तिर्थस्थळे मराठयांच्या अधिकाराखाली दिली. सदर फरमान स्विकारण्यासाठी 7 ऑगष्ट 1790 रोजी मथूरेजवळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभाचे निमंत्रण तुकोजी होळकर यालाही देण्यात आले होते. पण तुकोजी या समारंभाला हजर राहिला नाही. यामूळे महादजी संतप्त होऊन त्याने ''होळकराला आपल्या बरोबरीने येवू न देण्याची प्रतिज्ञा केली.''[20]

महादजीनेही होळकर घराण्याच्या विरोधात कारवाया करण्यास प्रारंभ केल्याचे दिसून येते. चितोडचा किल्ला व प्रदेश होळकराच्या अधिकार क्षेत्राखाली येत होता. त्याठिकाणी बंड झाले असतांना होळकराला कोणतीही सूचना न करता महादजीने त्याठिकाणी सैन्य पाठवून बंडाचा बिमोड केला.[21] तसेच जानेवारी 1792 मध्ये महादजी उजैयनीवरून पूण्याला गेला. यावेळी अहिल्याबाईचा जावई मृत्यू पावला होता. शिष्टाचार म्हणून जवळून जाऊनही अहिल्याबाईला भेटला नाही. त्याचबरोबर नियमाप्रमाणे संतवास गावावरून जातांना महादजीने होळकरांच्या अधिकाऱ्यांना चुंगीकरही दिला नाही, त्यामुळे संतप्त होऊन ''महादजी परत होईपर्यंत जीवंत राहणार नाही असा शाप अहिल्याबाईने दिला.[22] अशा शापाला काही अर्थ नसला तरी यावरून होळकरांच्या मनातील महादजीबद्दलच्या रागाची कल्पना येते. महादजी होळकराच्या अधिकार क्षेत्रात हस्तक्षेप करित असल्याचेही दिसून येते.[23]

वरील सर्व घटनांवरून शिंदे–होळकर यांच्यात परस्परांविरूद्ध वैमनस्याची भावना निर्माण झाल्याचे निदर्शनास येते. परस्परांचा सूड उगविण्याची तयारी त्यांनी सूरू केली. खरे यांनी नमुद केल्याप्रमाणे ''महादजीच्या कवायती फौजेचा प्रतिकार करता यावा म्हणून तूकोजीने ड्रेडनेक नावाच्या फ्रेंच सरदारांकडून स्वतः साठी कवायती फौज तयार करून घेतली.''[24] तर 1792 मध्ये महादजी पूण्याला गेला. त्यामागे महादजीचा उद्देश होळकरांच्या विरोधात न्याय मागण्याचा होता असे सरदेसाई म्हणतात. तर अनेकदा होळकराला ताकीदीचे पत्रे देऊनही त्याने दाद दिली नसल्याचे स्पष्टीकरण पूणे दरबाराने दिल्याचे दिसून येते.[25]

सप्टेंबर 1792 मध्ये शिद्यांच्या सरदारांनी गंगायमूनेच्या दोआबातील व मथूरा जिल्हयातील होळकरांच्या प्रदेशात धूमाकूळ माजविण्यात प्रारंभ केला. तर महादजीचा सरदार गोपाळरावभाऊ याने तुकोजी होळकराचा पुतण्या बापूजी होळकर याला अलवरच्या प्रदेशातून कर वसूली करण्यास प्रतिबंध केला. गोपाळराव सैन्यासह अलवरच्या प्रदेशात गेला. त्यामूळे व बापू होळकर याला परत जावे लागले.[27]

तुकोजीने महादजीच्या विरोधात संघर्ष करण्याकरिता जयपूरच्या राजाशी मदतीबाबत गुप्त करार केला. तर होळकरांच्या पेंढाऱ्यांनी शिंद्याच्या फौजांची लूट केल्याचे निमित्त समोर करून गोपाळराव भाऊ, जीवबादादा व डिबॉयन यांनी बनास नदीकाठी असलेल्या तुकोजीच्या शिबीरावर 8 आक्टोंबर 1792 रोजी हल्ला केला. या हल्ल्यानंतर तुकोजी पळून लखेरीला गेला.[28]

अशाप्रकारे शिंदे व होळकर यांच्यातील संघर्षाला लहान प्रमाणात कां होईना सुरूवात झाली. पण असा संघर्ष योग्य नसल्याची जाणीव होऊन गोपाळराव भाऊ, बापू होळकर व काशीराव होळकर यांनी परस्परांच्या भेटी घेऊन संघर्ष थांबविण्याचे प्रयत्न केले. यावेळी त्यांच्यात समझोताही झाला.[29]

पण हा समझोता अधिक काळ टिकला नाही. सरदाराच्या एका नोकराने आपला पराभव करावा ही बाब तुकोजी व होळकर कुंटुबाला सहन झाली नाही. अहिल्याबाईनेही या अपमानाचा बदला घेण्यासाठी पाहिजे तितका पैसा खर्च करण्याचीच नव्हे तर स्वतः युद्ध करण्याची तयारी दाखविली. यासाठी नवी लष्कर भरती सुरू केली असे सरकारांनी नमूद केले आहे.[30] यावेळी होळकर घराण्याची मानसिकता कशी होती हे तुकोजीने अहिल्याबाईला लिहिलेल्या दि. 15/12/1792 च्या पत्रावरून स्पष्ट होते. या पत्रात तुकोजीने लिहिले आहे की, ''....सोबत्याच्या फौजेने दया करून लौकिकाची हानी केली. याचा सूड घेतल्याखेरीज लौकिकात चांगले दिसणार नाही व उभे राहण्यास जागाही असे केल्याने होईल. नाहीतर खावंद सुद्धा कोणी मानणार नाही. एक वेळ सूड घ्यावा तरी निर्वाह.....''[31]

अशी सूडाची मानसिकता संपूर्ण होळकर घराण्याची बनली असतांना तुकोजीचा दुसऱ्या क्रमांकाचा मूलगा मल्हारराव घटनास्थळी आला. तो आक्रमक वृत्तीचा होता. शिंद्यांचे उच्छादन करण्याची वल्गना त्याने दिली. अहिल्याबाईनेही त्याचे समर्थन केले. पण पाराशर दादा व बापू होळकर यांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. पण मल्हाररावाने त्यांचा सल्ला मान्य केला नाही. अहिल्या स्मारिकेत नमूद केल्याप्रमाणे तुकोजीमध्ये मल्हाररावाला रोखण्याची ताकद नव्हती.[32]

मल्हारावाला अहिल्याबाईने शिंद्यावर सूड उगविण्याची परवानगी व प्रोत्साहन दिल्यामूळे शिंदे–होळकर यांच्यातील युद्ध अपरिहार्य ठरले, सरकारांनी म्हटल्याप्रमाणे ''होळकराशी अस्थायी समझोता झाल्यानंतर शिंद्यांचे सेनापती जयपूर व अलवरच्या प्रदेशात गेले होते. त्यांना होळकराच्या चढाऊ धोरणाची माहिती होताच ते संपूर्ण तयारीनिशी परत आले.''[33]

पूणे येथे वास्तव्याला असलेल्या महादजींनाही या परिस्थितीची माहिती मिळाली. त्यावेळी त्यांनी सदर गृहकलह संपूष्टात आणण्यासाठी पाऊले उचलण्याची विनंती कारभाऱ्यांकडे केली. पण कारभाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले[34] उलट नाना फडणवीसाने इंग्रज व निजामाच्या मदतीने महादजीचा पाडाव करण्यासाठी होळकराला उत्तेजन दिल्याचा आरोप सरदेसाई यांनी केला. त्यामूळे नाईलाजाने महादजीने आपल्या सरदारांना होळकरांचा बंदोबस्त करण्याचा आदेश दिला.[35]

महादजीच्या आदेशामूळे व होळकरांच्या दृढ निश्चयामूळे शिंदे व होळकर यांच्यातील युद्ध अनिवार्य बनले. 1 जून 1793 रोजी लखेरीच्या मैदानावर दोन्ही पक्षात लढाई झाली. या लढाईत होळकरांचा पराभव झाला. पूण्याला या युद्धाची वार्ता कळताच महादजीने आनंद व्यक्त करण्यासाठी तोफा सोडण्यास मनाई केली.[36]

मात्र असा संघर्ष मराठयांच्या मुख्य सरदारांमध्ये घडून येणे राज्याच्या व कोणाच्याच हिताचे नसल्याची जाणीव दोन्ही पक्षांना तसेच पूणे दरबाराला झाली. त्यामूळे त्यांनी ऑगष्ट 1793 मध्ये समेट घडवून आणला.[37] पण हा समेट तात्पुरताच होता हे नंतरच्या घटनाक्रमावरून दिसून येते.

निष्कर्ष :–

1782 ते 1794 या काळातील शिंदे–होळकर यांच्या परस्परांविरोधी भूमिका व कार्याचा आढावा घेतल्यानंतर दिसून येते की, पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील मराठयांच्या दारूण व विनाशकारी पराभवापासून कोणताही बोध विशेषतः होळकर घराण्याने घेतला नाही. कर्तृत्वाचा व प्रभावी नेतृत्वाचा अभाव असतांनाही महादजी शिंदेशी बरोबरी करण्याचा सातत्याने प्रयत्न तुकोजी होळकर याने केला. अहिल्याबाई होळकर यांनीही केवळ द्वेषापोटी तुकोजीला महादजीच्या विरोधात चिथावणी दिली. वास्तविकतः अहिल्याबाई व तुकोजी यांच्यात मतभेद व दुही अस्तित्वात असल्याचे तत्कालीन साधनांवरून दिसते.

महादजी शिंदे याने स्वतःच्या कर्तुत्वाने व नेतृत्व गुणाने मराठा सत्ताकारणातच नव्हे तर राष्ट्रीय स्तरावर आपला प्रभाव निर्माण केला होता. बारभाई मंडळाच्या स्थापनेपासून ते 1794 पर्यंत मराठा सत्तेची लष्करी बाजू त्यांनी समर्थपणे सांभाळली होती. अनेक कठीण प्रसंगातून मराठा राज्याला सुरक्षित ठेवले होते. दिल्लीच्या बादशाहाची पूर्नस्थापना करून उत्तर भारतात मराठयांचा प्रभाव व दरारा पुन्हा निर्माण केला होता. पहिल्या इंग्रज–मराठा युद्धात इंग्रजांचा पराभव करण्याचे श्रेय महादजी शिंदे यांनाच जाते. यामुळेच इंग्रजांनी महादजीच्या माध्यमातूनच सालबाईचा तह केला होता. महादजी शिंदे हयातीत होते, तोपर्यंत इंग्रजांनी मराठयांविरूद्ध संघर्ष करण्याचे धाडस केले नाही किंवा मराठयांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केला नाही. अशा कर्तृत्वसंपन्न व प्रभाव व्यक्तीची बरोबरी करता येत नाही म्हणून द्वेषभावना ठेवून त्याच्याविरूद्ध कारवाया करण्यातच समाधान मानण्याची मानसिकता होळकर घराण्याची असल्याचे निदर्शनास येते.

अर्थात काही बाबतीत महादजी शिंदेकडून चूका झाल्याचेही दिसून येते. पण त्याचे प्रमाण अत्यल्प दिसते. सातत्याने महादजीच्या विरोधात भूमीका घेतल्यामूळे व शह देण्याचा प्रयत्न केल्यामूळे महादजीच्या व त्याच्या समर्थकांचे मनांत होळकरांबद्दल विरोधाची भावना निर्माण झाली असावी. महादजी राजपूतांन्यात अडचणीत असतांना वारंवार मदतीची याचना करूनही होळकरांनी मदत केली नाही. याचाही परिणाम महादजीच्या होळकराप्रतीच्या दृष्टीकोनावर झाला असावा. या सर्वाचा परिणाम महादजीच्या वर्तणूकीतून व्यक्त होणे शक्य होते.

याचबरोबर पूणे दरबाराकडूनही शिंदे–होळकर संबंध अधिक खराब करण्याचे धोरण अंगीकारल्या गेले होते, असेही दिसून येते. यावेळी सवाई माधवराव हा पेशवा असला तरी त्याच्यावर नाना फडणवीसांचे पूर्ण नियंत्रण होते. कार्य व निर्णयाचे स्वातंत्र्य पेशव्याला नव्हते. त्यामूळे तो सरदारांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ होता. सर्व सत्ता नाना फडणवीसाकडे होती. तोच संचालनकर्ता होता. त्याच्याही मनात महादजीच्या वाढत्या प्रभूत्व व लौकीकामुळे असूयेची भावना निर्माण झाली होती. महादजीचा प्रभाव कमी

करण्यासाठी नानाने तुकोजीचा वापर केला होता असेही प्रत्ययास येते. नाना फडणवीसाच्या तुकोजीला महादजीच्या विरोधात चिथावणी देण्यामूळे तुकोजीने महादजीच्या विरोधात कारवाया वाढविल्या. याचा परिणाम लखेरीच्या मैदानावर शिंदे व होळकर सैन्यात लढाई होण्यात झाला. या लढाईमूळे महादजीचे वर्चस्व सिद्ध झाले असले तरी होळकर घराण्याचा कमकुवत पणा सिद्ध झाला. अतिमतः यामूळे मराठा राज्याचेच नूकसान झाले. अंतर्गत दुही उघड झाली.

लखेरीच्या युद्धानंतर शिंदे–होळकर यांच्यात समेट झाला असला तरी अतःकरणातून परस्परांबद्दलची असूयेची, विरोधाची भावना नष्ट झाली नाही. उलट 1795 नंतर ही भावना शत्रूत्वात व उघड संघर्षात परिवर्तीत झाली. यामूळे मराठेशाहीबरोबरच शिंदे, होळकर घराण्याच्या सत्तेचाही अंत घडून आला. हे प्रतिबिंबित करण्याच्या उद्देशाने सदर शोध निबंध सादर करीत आहे.

तळटिपा :–

1. ठाकूर वा.वा. – होळकर शाहीचा इतिहास खंड 1 – 1946 पृ. 327 व सरदेसाई – मराठोंका नविन इतिहास खंड 3 पृ. 156, 157
2. ठाकूर – खंड 1 पृ. 325 व सरदेसाई – मराठा रियासत उत्तरार्थ खंड 2 पृ. 140, 141
3. सरदेसाई – मराठा रियासत उत्तरार्थ खंड 2 पृ. 127
4. कानुनगो एस.एन. यशवंतराव होळकर, 4 गोल्डन रोग – 1965 पृ. 49
5. ठाकूर – खंड 1 पृ. 15
6. सरदेसाई – मराठा रियासत उत्तरार्थ खंड 2 पृ. 151
7. सर यदुनाथ सरकार – मुगल साम्राज्य का पतन खंड 4 पृ. 9
8. सरदेसाई – मराठा रियासत उत्तरार्थ खंड 2 पृ. 153
9. कित्ता – पृ. 253
10. ठाकूर – खंड 1 पृ. 337
11. सरकार – खंड 4 पृ. 9
12. ठाकूर – होळकरशाहीच्या इतिहासाची साधने पत्र क्र. 349
13. भागवत अ.ना. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भा. 1 पृ. 50
14. सरकार – 4, पृ. 64
15. कित्ता – पृ. 40
16. सरदेसाई – मराठा रियासत उत्तरार्थ खंड 2 पृ. 214, 215
17. सरकार – खंड 4 पृ. 40, 41
18. सरदेसाई – मराठा रियासत उत्तरार्थ खंड 2 पृ. 245
19. सरकार – खंड 4 पृ. 12, 14
20. कित्ता – पृ. 64
21. सरकार – 4 पृ. 52, 53, 54, 55
22. सरदेसाई – मराठों का नवीन इतिहास खंड 3 पृ. 218
23. ठाकुर – साधने खंड 1 पृ. 293
24. खरे – ऐ.ले.स. 9 पृ. 4604, 4605
25. सरदेसाई – मराठा रियासत उत्तरार्थ खंड 2 पृ. 377, 378, 402
26. सरकार – खंड 4 पृ. 67
27. ठाकूर – होळकर शाहीचा इतिहास खंड 1, पृ. 346
28. सरकार – खंड 4, पृ. 68
29. राजवाडे – मराठयांच्या इतिहासाची साधने खंड 7, पृ. 15
30. सरकार – खंड 4 पृ. 69
31. ठाकूर – खंड 1, पृ. 384
32. अहिल्या स्मरणिका – 1975 – पृ. 15, 90
33. सरकार – खंड 4 पृ. 72
34. खरे – ऐ.ले. संग्रह खंड 9 पृ. 3516
35. सरदेसाई – मराठा रियासत उत्तरार्थ खंड 2 पृ. 404
36. ठाकूर – होळकर शाहीचा इतिहास 1, पृ. 351
37. कित्ता – होळकर शाहीचा इतिहास 1, पृ. 351

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ Directory Of Research Journal Indexing
- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com